30 AUG 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट प्रोग्राम आणि राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधत हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत आज मिनी मॅरेथॉन स्पर्धा काढण्यात आली.

# मिनी मॅरेथॉनमध्ये धावले खेळाडू, विद्यार्थी

## प्राध्यापक, प्रशासकीय सेवकांचा सहभाग; राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजन

कोल्हापूर, ता. २९ : जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट प्रोग्राम आणि राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधत हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत आज मिनी मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. त्यात नियमित धावपटू, खेळाडू, संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक असे सुमारे ४०० जण धावले.


कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनासमोर ध्वज दाखवून मिनी मॅरेथॉनला प्रारंभ झाला. 'आपल्या राष्ट्राच्या गौरवासाठी धावा' असे मॅरेथॉनचे ब्रीद होते. मानव्यशास्त्र इमारत, मुलींचे वसतिगृह, कुलगुरू निवासस्थान, दूरशिक्षण केंद्र, क्रीडा अधिविभाग, क्रांतीवन, मुलांचे वसतिगृह, परीक्षा भवन, भाषा भवन, रसायनशास्त्र अधिविभाग, मुख्य इमारतीच्या समोरील अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा परिसर मार्गे राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृह येथे मॅरेथॉनची सांगता झाली.

दरम्यान, विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. तानाजी चौगुले, आजीवन अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, इरण्णा उडचण, योगेश मांगुरे-पाटील, किरण पाटील, जालंदर मेंढे आदी उपस्थित होते.

### या मॅरेथॉनमधील विजेते

■ तुकाराम मोरे (अर्थशास्त्र), विजय बाजबाळकर (बी.लीप), मयुरेश हासोळकर (इतिहास), विठ्ठल मोटे (इंग्रजी), आशुतोष हंकारे (औद्योगिक रसायनशास्त्र), प्रेरणा घाडगे (तंत्रज्ञान), विजया कालोले (तंत्रज्ञान), प्रज्ञा पाटील (रसायनशास्त्र), तृप्ती इंगळे (इंग्रजी), अपर्णा फाळके (वनस्पतीशास्त्र), डॉ.सागर डेळेकर, गजानन राशिनकर, लक्ष्मण परीट (रसायनशास्त्र), एस. एम. पाटील (वनस्पतीशास्त्र), नितीन नाईक (सुक्ष्मजीवशास्त्र), प्रशांत जाधव (विद्यापीठ ग्राहक भांडार), निलांबरी जगताप (मराठा इतिहास), अनुप्रीया तरवाळ (रसायनशास्त्र).

लोकमत



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी मिनी मॅरेथॉन स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# विद्यापीठात मिनी मॅरेथॉन उत्साहात

## ४०० स्पर्धकांचा सहभाग : 'राष्ट्राच्या गौरवासाठी धावा'चा संदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट प्रोग्राम व राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधत शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत मंगळवारी आयोजित मिनी मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात झाली. स्पर्धेत ४०० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. धावपटू, खेळाडू, संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक हे मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनासमोर ध्वज दाखवून स्पर्धेस प्रारंभ झाला. 'आपल्या राष्ट्राच्या गौरवासाठी धावा' हा संदेश घेऊन मानव्यशास्त्र इमारतमार्गे धावत हे स्पर्धक मुलींचे वसतिगृह, कुलगुरू निवासस्थान, दूरशिक्षण केंद्र, क्रीडा अधिविभाग, क्रांतिवन, मुलांचे वसतिगृह, परीक्षाभवन, भाषाभवन, रसायनशास्त्र अधिविभाग, मुख्य इमारतीसमोरील अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोरून राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृह येथे आल्यावर स्पर्धेची सांगता झाली.

डॉ. सागर डेळेकर, डॉ. गजानन राशिनकर, लक्ष्मण परीट (रसायनशास्त्र), डॉ. एस. एम. पाटील (वनस्पतिशास्त्र), नितीन नाईक (सूक्ष्मजीवशास्त्र), प्रशांत जाधव (विद्यापीठ ग्राहक भांडार), डॉ. निलांबरी जगताप (मराठा इतिहास), अनुप्रिया तरवाळ (रसायनशास्त्र) यांनीही या स्पर्धेत भाग घेतला.

**स्पर्धेचा निकाल :** मुलांमध्ये प्रथम - तुकाराम मोरे (अर्थशास्त्र), द्वितीय- विजय बाजबाळकर (बी. लिब.), तृतीय- मयूरेश हासोळकर (इतिहास).

**मुली :** प्रथम- प्रेरणा घाडगे (तंत्रज्ञान), द्वितीय- विजया कालोले (तंत्रज्ञान), तृतीय - प्रज्ञा पाटील (रसायनशास्त्र).

पुढारी



कोल्हापूर : राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाने घेतलेल्या मिनी मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झालेले खेळाडू.

# विद्यापीठातील मिनी मॅरेथॉनमध्ये ४०० स्पर्धकांचा सहभाग

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट प्रोग्राम व राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधत हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागाने घेतलेल्या मिनी मॅरेथॉन स्पर्धेत ४०० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. नियमित धावपटू, खेळाडू, संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक उत्साहाने सहभागी झाले होते.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनासमोर ध्वज दाखवून स्पर्धेस प्रारंभ झाला. 'राष्ट्राच्या गौरवासाठी धावा' हा संदेश घेऊन मानव्यशास्त्र इमारतमार्गे धावत हे स्पर्धक मुलींचे वसतिगृह, कुलगुरू निवासस्थान, दूरशिक्षण केंद्र, क्रीडा अधिविभाग, क्रांतिवन, मुलांचे वसतिगृह, परीक्षा भवन, भाषा भवन, रसायनशास्त्र अधिविभाग, मुख्य इमारतीच्या समोरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोरून राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृह येथे स्पर्धेची सांगता झाली.

स्पर्धेचा निकाल असा, मुले : १) तुकाराम मोरे, २) विजय बाजबाळकर, ३) मयुरेश हासोळकर, ४) विठ्ठल मोटे, ५) अशुतोष हंकारे. मुली : १) प्रेरणा घाडगे, २) विजया कालोले, ३) प्रज्ञा पाटील, ४) तृप्ती इंगळे, ५) अपर्णा फाळके.

अधिविभाग शिक्षक, प्रशासकीय सेवक पुढीलप्रमाणे : डॉ. सागर डेळेकर, डॉ. गजानन राशिनकर, लक्ष्मण परीट (रसायनशास्त्र), डॉ. एस. एम. पाटील (वनस्पतिशास्त्र), नितीन नाईक (सूक्ष्मजीवशास्त्र), प्रशांत जाधव (विद्यापीठ ग्राहक भांडार), डॉ. निलांबरी जगताप (मराठा इतिहास), अनुप्रिया तरवाळ (रसायनशास्त्र).

लोकमत

# मेजर ध्यानचंद यांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधत मेजर ध्यानचंद यांची जयंती मंगळवारी शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी केली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये कुलगुरू डॉ. डी.टी शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्याहस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. तानाजी चौगुले, आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदी डॉ. व्ही. एन. शिंदे



**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदी विलास नेताजी तथा व्ही. एन. शिंदे यांची निवड करण्यात आली. जवळपास दीड वर्ष हे पद रिक्त होते. मंगळवार, २९ ऑगस्ट रोजी कुलसचिवपदासाठी मुलाखती झाल्या. मुलाखतीसाठी सोळा उमेदवार पात्र ठरले होते, तर चौदा उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित होते. व्ही. एन. शिंदे यांच्याकडे गेल्या दीड वर्षापासून कुलसचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार होता. यापूर्वी त्यांनी उपुकलसचिवपदी काम केले आहे.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदी व्ही.एन. शिंदे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदी डॉ. विलास नेताजी तथा व्ही.एन. शिंदे यांची मंगळवारी निवड करण्यात आली. दीड वर्षापासून रिक्त असलेल्या या पदासाठी मुलाखती झाल्या. त्यातून डॉ. शिंदे यांची निवड करण्यात आली. पात्र सोळापैकी चौदा उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित होते. या पदाचा कार्यभार सुमारे दीड वर्षे डॉ. शिंदे यांच्याकडेच होता. त्यामुळे प्रभारी शब्द कमी होऊन विद्यापीठास कायमस्वरुपी कुलसचिव मिळाले.



तत्कालीन कुलसचिव विलास नांदवडेकर यांचा कार्यकाल संपल्यानंतर हे पद रिक्त होते. या पदाचा प्रभारी कार्यभार व्ही.एन. शिंदे यांच्याकडेच होता. कुलसचिव पदाच्या मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांत प्रभारी कुलसचिव व्ही.एन. शिंदे, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले विद्यापीठातील परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, बॉटनी विभागातील डॉ. आर.व्ही. गुरव, इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे डॉ. एम.के. भानारकर, डॉ. प्रमोदकुमार शिरोटे, उपकुलसचिव संजय कुबल, धनंजय ठोंबरे, रविकुमार नाईक, विजय कुंभार, श्रीकांत अंधारे, प्रकाश पाटील, सचिन कदम, मलिक रोकडे, डॉ. बाजीराव पाटील, परशराम शहापूरकर यांचा समावेश होता. मुलाखतीला विजय कुंभार, प्रकाश पाटील हे अनुपस्थित होते. कुलसचिव निवड समितीसमोर दिवसभर मुलाखती पार पडल्या. त्यानंतर डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्या कुलसचिवपदी निवडीची घोषणा करण्यात आली. कुलगुरू डी.टी. शिर्के, प्र.कुलगुरू पी.एस. पाटील यांच्या उपस्थितीत डॉ. शिंदे यांना नियुक्तीचे पत्र दिले.

> शिवाजी विद्यापीठ ही माझी मातृसंस्था असून तिचा लौकिक उंचावण्यासाठीच आजवर काम करीत आलो आहे. या संस्थेच्या कुलसचिवपदाची जबाबदारी ही माझ्या दृष्टीने सर्वोच्च संधी असून येथील सर्व घटकांना सोबत घेऊन या पुढील काळात काम करण्यास प्राधान्य राहील.
>
> - डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

पुढारी

# डॉ. विलास शिंदे शिवाजी विद्यापीठाचे नवे कुलसचिव



**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. विलास नेताजी शिंदे यांची शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदी निवड करण्यात आली. विद्यापीठाचे ते ११ वे कुलसचिव आहेत. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी डॉ. शिंदे यांना मंगळवारी नियुक्तीचे पत्र देऊन अभिनंदन केले.

तत्कालीन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांचा कार्यकाल जुलै २०२१ मध्ये संपल्यानंतर हे पद रिक्त होते. या पदावर नेमकी कोणाची वर्णी लागणार याविषयी शिक्षण क्षेत्रात उत्सुकता होती. मंगळवारी मुलाखती पार पडल्या. मुलाखतीसाठी १६ उमेदवार पात्र ठरले. त्यापैकी १४ उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित होते. कुलसचिव निवड समितीसमोर पान १० वर


# डॉ. विलास शिंदे शिवाजी विद्यापीठाचे नवे कुलसचिव


(पान १ वरून) उमेदवारांच्या मुलाखती दिवसभर होत्या. सायंकाळी निवडीची घोषणा करण्यात आली.

डॉ. शिंदे हे चिंचोली (ता. बार्शी, जि. सोलापूर) येथील आहेत. त्यांना प्रशासकीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव आहे. यापूर्वी त्यांनी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे २०१० ते २०१२ या कालावधीत कुलसचिवपद भूषविले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या सोलापूर येथील पदव्युत्तर शिक्षण केंद्रासह विद्यापीठाच्या विविध विभागांचे उपकुलसचिव म्हणून कामकाज पाहिले आहे. सध्या ते सभा व निवडणुका, उद्यान या विभागांसह प्रभारी कुलसचिव पदाचे कामकाज पाहात होते.

> शिवाजी विद्यापीठ माझी मातृसंस्था असून तिचा लौकिक उंचावण्यासाठीच काम करीत आलो आहे. कुलसचिव पदाची जबाबदारी माझ्या दृष्टीने सर्वोच्च संधी आहे. सर्व घटकांना सोबत घेऊन यापुढील काळात काम करण्यास प्राधान्य राहील.
>
> - डॉ. व्ही. एन. शिंदे, नूतन कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धन हे त्यांचे जिव्हाळ्याचे विषय असून शिवाजी विद्यापीठ जलयुक्त होण्याच्या दिशेने त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. विज्ञान साहित्यिक म्हणून डॉ. शिंदे लोकप्रिय असून त्यांची एककांचे मानकरी, असे घडले भारतीय शास्त्रज्ञ, हिरव्या बोटांचे किमयागार, आवर्त सारणी व मूलद्रव्यांची दुनिया आणि एककांचे इतर मानकरी ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांना महाराष्ट्र शासनाच्या यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कारांमधील विज्ञान साहित्यासाठीचा 'महात्मा जोतीराव फुले पुरस्कार' प्राप्त झाला आहे.

त्याचबरोबर जी. डी. कुलकर्णी पारितोषिक, विकासात्मक संशोधनाबद्दल इंडियन क्रायोजेनिक्स कौन्सिलचे प्रा. एम. सी. जोशी पारितोषिक, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचा कृ. गो. सूर्यवंशी साहित्य पुरस्कार, वसुंधरा पुरस्कार आणि विज्ञान प्रसारासाठी लेखन आणि कार्यासाठी इंडियन फिजिक्स असोसिएशन, पुणे यांचा मो. वा. चिपळूणकर पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

30 AUG 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आहारात भरड धान्याचा वापर करून आरोग्य जपा; तज्ज्ञांचा सल्ला

## 'ईट राईट मिलेट मेला' कार्यक्रमांतर्गत परिसंवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय संस्कृतीत भरड धान्यांचा वापर सतत केलेला आहे. दैनंदिन आहार आधुनिकतेनुसार बदलला आहे. आहारात भरड धान्यांचा जास्तीत जास्त वापर करून आरोग्य जपावे, असा संदेश सर्व तज्ज्ञ मंडळींनी परिसंवादात दिला.

आंतरराष्ट्रीय भरड धान्यवर्षानिमित्त शिवाजी विद्यापीठ व भारतीय अन्नसुरक्षा आणि मानक प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने 'ईट राईट मिलेट मेला' कार्यक्रम झाला.

परिसंवादामध्ये सिद्धगिरी कृषी विज्ञान केंद्र कणेरीच्या प्रतिभा बसवंत-ठोंबरे, स्मॉल मिलेट झोनल ॲग्री रिसर्च स्टेशनचे डॉ. योगेश बान, कृषी विज्ञान केंद्र तळसंदेच्या दीपाली मस्के, चितळे ग्रुपचे गिरीष चितळे, प्रा. डॉ. ज्योती जाधव, डॉ. के. यू. मेथेकर यांनी सहभाग घेतला.

भरड धान्यामध्ये औषधी गुणधर्म असून ते अनेक असाध्य रोगांवर उपयुक्त ठरतात व नैसर्गिक अशी ही धान्य पिकवण्यासाठी पेस्टीसाईडची गरज भासत नाही. भारतीय संस्कृतीमधील या लुप्त होत चाललेल्या भरड धान्यांचा आर्थिक व आरोग्यासाठी वापर करावा, असे मत प्रा. जाधव यांनी व्यक्त केले. सर्व गुणधर्म असणाऱ्या या भारतीय धान्यांची शेतकऱ्यांना लागवड कशी करता येईल, याची सखोल माहिती डॉ. बान यांनी दिली. भरड धान्ययुक्त पौष्टिक आहाराचे आरोग्यास होणारे फायदे याबाबत ठोंबरे यांनी मार्गदर्शन केले. भरड धान्यांमधील पोषक तत्त्वांद्वारे दैनंदिन आहार सात्विक आहार कसा बनवता येईल. ही धान्ये कमी दरात शेतकरी ते ग्राहक यांच्यापर्यंत कशी पोहोचवता येतील, याबद्दल मस्के यांनी विचार मांडले. भरड धान्य प्रक्रियायुक्त पदार्थांची उद्योजकता कशी वाढवता येईल, याची माहिती चितळे ग्रुपचे उद्योजक चितळे यांनी दिली. भरड धान्यांचे महत्त्व लक्षात घेऊन दैनंदिन आहारामध्ये याचा वापर करून आरोग्य जपावे, असे आवाहन डॉ. मेथेकर यांनी केले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा जिल्हास्तरीय युवा महोत्सवास ३ ऑक्टोबरपासून

## सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयास यजमानपद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ४३ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवास ३ ऑक्टोबरपासून प्रारंभ होणार आहे. कोल्हापूर जिल्हा युवा महोत्सवाचे यमजानपद सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड यांना मिळाले आहे.

विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाने युवा महोत्सवाचे वेळापत्रक व नियमावली जाहीर केली आहे. महोत्सवात लोकनृत्य, एकांकिका, लघुनाटिका, मूकनाट्य, पथनाट्य, लोकसंगीत, वाद्यवृंद, प्रश्नमंजुषा या सांघिक प्रकारासह नकला, सुगमगायन, स्थळ चित्र, व्यंग चित्र, वक्तृत्व (मराठी, हिंदी, इंग्रजी) या वैयक्तिक आदी ३२ कलाप्रकारांचा समावेश आहे. जिल्हास्तरीयमध्ये ३००, तर मध्यवर्ती युवा महोत्सवात २५० विद्यार्थी कलाकार सहभागी होतील.

| जिल्हा | यजमानपद | दिनांक |
|---|---|---|
| कोल्हापूर | सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय | ३ ऑक्टोबर |
| सांगली | वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द | ५ ऑक्टोबर |
| सातारा | कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव | ७ ऑक्टोबर |
| मध्यवर्ती | दहिवडी कॉलेज, दहिवडी (सातारा) | ११ ते १३ ऑक्टोबर |



जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवात सहभागी होण्यासाठी २५ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन प्रवेशिका पाठविण्याची मुदत आहे. सहभागी महाविद्यालयांनी सांघिक आणि वैयक्तिक स्पर्धेचे शुल्क पेमेंट गेटवे ऑनलाईन पद्धतीचे भरायचे आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना युवा महोत्सवात सहभागी होता यावे, यासाठी परीक्षांचे वेळापत्रक ३ ते १३ ऑक्टोबर हा कालावधी वगळून निश्चित करावे, असे आवाहन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा ११ ऑक्टोबरपासून युवा महोत्सव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या ४३ व्या युवा महोत्सवाची घोषणा करण्यात आली आहे. जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा अशा द्विस्तरीय पद्धतीने होणार असून, मध्यवर्ती युवा महोत्सव तीन दिवस आहे.

पहिल्या टप्प्यात जिल्हास्तरीय महोत्सव होतील. यामध्ये कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सव ३ ऑक्टोबर रोजी लोकनेते सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड येथे होणार आहे. ५ ऑक्टोबर रोजी सांगली जिल्हास्तरीय युवा महोत्सव वारणा महाविद्यालय, ऐवतडे खुर्द येथे आहे. ७ ऑक्टोबर रोजी सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सव कला व वाणिज्य महाविद्यालय, पुसेगाव येथे आहे, तर मध्यवर्ती युवा महोत्सव तीन दिवस चालणार आहे. ११ ते १३ ऑक्टोबर या कालावधीत मध्यवर्ती युवा महोत्सव दहीवडी कॉलेज येथे होणार आहे.

दरम्यान, जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवात सहभागी होण्यासाठी २५ सप्टेंबरपर्यंत महाविद्यालयांनी सहभागी होणाऱ्या कलाप्रकारांसाठी प्रवेशिका ऑनलाईन भरावयाच्या आहेत.

लोकमत

# दहिवडीत ११ ऑक्टोबरपासून युवा महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ४३ वा मध्यवर्ती युवा महोत्सव यंदा दहीवडी कॉलेजमध्ये (ता. माण, जि. सातारा) आयोजित केला आहे. ११ ते १३ ऑक्टोबर या कालावधीत हा महोत्सव होणार आहे. विद्यापीठाने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाच्या तारखा जाहीर केल्या आहेत. कोल्हापूरचा जिल्हास्तरीय युवा महोत्सव ३ ऑक्टोबरला मुरगूड (ता. कागल) येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात होणार आहे. सांगली जिल्ह्याचा युवा महोत्सव ५ ऑक्टोबरला ऐतवडे खुर्द (ता. वाळवा) येथील वारणा महाविद्यालयात तर सातारा जिल्ह्याचा युवा महोत्सव ७ ऑक्टोबरला पुसेगाव कला व वाणिज्य महाविद्यालयात होईल. यात सहभागी होण्यासाठीच्या प्रवेशिका २५ सप्टेंबरपर्यंत ऑनलाइन पद्धतीने पाठवण्याची मुदत आहे. महाविद्यालयांनी सांघिक व वैयक्तिक स्पर्धांचे शुल्क विद्यापीठाच्या पेमेंट गेटवे या ऑनलाइन प्रणालीद्वारे भरायचे आहे. महाविद्यालयांनी ३ ते १३ ऑक्टोबर वगळून परीक्षांचे वेळापत्रक निश्चित करावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

पुढारी

विद्यापीठ

# हिवाळी सत्र परीक्षा अर्ज प्रक्रियेस मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२३ हिवाळी सत्रातील परीक्षा अर्ज प्रक्रियेस ११ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. विद्यापीठातर्फे हिवाळी सत्रातील परीक्षा अर्जाच्या तारखा प्रसिद्ध केल्या आहेत. काही महाविद्यालयांकडून परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखांना मुदतवाढ मिळण्याबाबत विनंती केली. त्यामुळे विद्यार्थी हितास्तव परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखांमध्ये मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना महाविद्यालय, पदव्युत्तर विभागात १६ सप्टेंबरपर्यंत अतिविलंब शुल्कासह अर्ज करता येणार आहे. महाविद्यालय आणि पदव्युत्तर विभागाने विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज १२ ते १६ सप्टेंबर या कालावधीत अप्रुव्ह करावेत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

30 AUG 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या कुलसचिवपदी डॉ. व्ही. एन. शिंदे

## दीड वर्षानंतर निवड प्रक्रिया पूर्ण; १४ उमेदवारांनी दिली अंतिम मुलाखत

▶सकाळ वृत्तसेवा



डॉ. व्ही. एन. शिंदे

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदी डॉ. विलास नेताजी तथा व्ही. एन. शिंदे यांची आज निवड झाली. सात सदस्यीय निवड समितीने अंतिम मुलाखतीची प्रक्रिया राबविली. दीड वर्षांनंतर विद्यापीठाला पूर्णवेळ कुलसचिव मिळाले. विद्यापीठाचे ११ वे कुलसचिव असणाऱ्या डॉ. शिंदे यांचा कार्यकाळ पाच वर्षांचा असणार आहे.

या कुलसचिवपदाच्या मुलाखत प्रक्रियेसाठी १६ उमेदवार पात्र ठरले होते. त्यापैकी १४ जण मुलाखतीसाठी उपस्थित राहिले. त्यांच्या मुलाखती घेवून डॉ. शिंदे यांची समितीने अंतिम निवड केली. ते गेल्या दीड वर्षांपासून प्रभारी कुलसचिव म्हणून कार्यरत आहेत.

> ‘शिवाजी विद्यापीठ ही माझी मातृसंस्था आहे. तिचा लौकिक उंचावण्यासाठीच मी आजवर काम करीत आलो आहे. या संस्थेच्या कुलसचिव पदाची जबाबदारी ही, माझ्या दृष्टीने सर्वोच्च संधी आहे. येथील सर्व घटकांना सोबत घेऊन या पुढील काळात काम करण्यास प्राधान्य राहील.
>
> **-डॉ. विलास शिंदे**, कुलसचिव

त्यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी नियुक्तीचे पत्र दिले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, उपकुलसचिव वैभव ढेरे, डॉ. पी. टी. गायकवाड उपस्थित होते.

डॉ. विलास नांदवडेकर यांचा कुलसचिवपदाचा कार्यकाळ १७ नोव्हेंबर २०२१ रोजी पूर्ण झाला. त्यानंतर विद्यापीठाने दोनवेळा या पदाच्या भरतीसाठी प्रक्रिया राबविली. पण, तांत्रिक कारण आणि एकवेळा निवड समितीला एकही उमेदवार पात्र वाटला नाही. यावेळी मुलाखत दिलेल्या उमेदवारांमध्ये डॉ. शिंदे यांचा देखील समावेश होता. कुलसचिव निवडीची प्रक्रिया पुन्हा २० जुलै २०२२ रोजी सुरू झाली. त्यामध्ये अर्ज केलेल्या उमेदवारांपैकी १६ जण मुलाखतीच्या अंतिम प्रक्रियेसाठी पात्र ठरले. मुलाखतीची प्रक्रिया प्रक्रिया आज विद्यापीठात पार पडली. त्यात डॉ. शिंदे यांची कुलसचिवपदी निवड झाली. त्यांचे मूळ गाव चिंचोली (ता. बार्शी) आहे. त्यांनी शिवाजी विद्यापीठातून एम.एस्सी., पीएच.डी. (भौतिकशास्त्र) पदवी घेतली. त्यानंतर सन १९९९ मध्ये ते विद्यापीठात रूजू झाले. त्यांनी पदार्थविज्ञान शास्त्र अधिविभागाचे अधिव्याख्याता, उपकुलसचिव, प्रभारी कुलसचिव, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कुलसचिवपदी काम केले आहे. विद्यापीठ परिसरातील बगिचा विकास, पाण्याबाबत विद्यापीठाला स्वयंपूर्ण करण्यात त्यांनी योगदान दिले आहे. विज्ञान, कृषी आदी विविध विषयांवर ते लेखन करतात. त्यांची पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. दरम्यान, मुलाखतीच्या प्रक्रिया राबविणाऱ्या निवड समितीतील एका सदस्याबाबत ‘सुटा’ने आक्षेप घेतला. त्याबाबतचे पत्र कुलगुरूंना दिले.

### दीड वर्षाचा योगायोग


▪ यापूर्वी तत्कालीन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या कारकिर्दीमध्ये देखील कुलसचिवपद रिक्त झाल्यानंतर दीड वर्षानंतर डॉ. नांदवडेकर यांच्या निवडीने पूर्णवेळ कुलसचिव मिळाले होते. आता देखील दीड वर्षांनीच विद्यापीठाला पूर्णवेळ कुलसचिव मिळाले आहेत.

सकाळ

# ऑक्टोबरमध्ये रंगणार विद्यापीठाचा युवा महोत्सव

## दहीवडी येथे होणार मध्यवर्ती महोत्सव

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाचा ४३ वा युवा महोत्सव यावर्षी ऑक्टोबरमध्ये रंगणार आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हास्तरीय महोत्सव ३ ते ७ ऑक्टोबरदरम्यान, तर दहीवडी (जि. सातारा) येथे ११ ते १३ ऑक्टोबर या कालावधीत मध्यवर्ती महोत्सव होणार आहे.



कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सव ३ ऑक्टोबर रोजी मुरगूड (ता. कागल) येथील लोकनेते सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात होणार आहे. सांगली जिल्ह्याचा महोत्सव ऐतवडे खुर्द येथील वारणा महाविद्यालयात ५ ऑक्टोबर, तर पुसेगाव येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात सातारा जिल्ह्याचा महोत्सव ७ ऑक्टोबर रोजी होणार आहे. दहीवडी महाविद्यालयात मध्यवर्ती युवा महोत्सव होईल. जिल्हास्तरीय महोत्सव विविध १४, तर मध्यवर्ती महोत्सव ३४ कलाप्रकारांमध्ये होणार आहे. त्यात सांघिक आणि वैयक्तिक स्पर्धा होतील. महोत्सवात सहभागी होण्यासाठी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांनी ऑनलाईन प्रवेशिका भरायची आहे.

### तज्ज्ञ परीक्षकांबाबत आवाहन

या जिल्हास्तरीय आणि मध्यवर्ती महोत्सवाअंतर्गत विविध कलाप्रकारांच्या स्पर्धा होतात. त्यांच्या परीक्षणासाठी तज्ज्ञ परीक्षक आणि त्याबाबतचे काम करण्यास इच्छुक असणाऱ्यांची माहिती विहित नमुन्यांमध्ये २० जुलैपर्यंत विद्यापीठाला सादर करण्याचे आवाहन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी केले आहे.

सकाळ

# विद्यापीठाच्या परीक्षांचे अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात हिवाळी सत्रात विविध अभ्यासक्रमांच्या पदविका, पदवी आणि पदव्युत्तर परीक्षा होणार आहेत. त्यांची संख्या एकूण ७५१ आहे. या परीक्षांचे अर्ज विनाविलंब शुल्कासह भरण्याची मुदत ११ सप्टेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया १४ ऑगस्टपासून सुरू झाली. विनाविलंब शुल्काची मुदत ३१ ऑगस्टपर्यंत आहे. मात्र, महाविद्यालयांनी या अर्ज भरण्याच्या प्रक्रियेस मुदतवाढ देण्याची मागणी विद्यापीठाकडे केली. त्यानुसार विद्यापीठाने ११ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली. त्यानंतर विलंब शुल्कासह अर्ज करण्याची मुदत १४ सप्टेंबर, तर अतिविलंब शुल्कासह मुदत १६ सप्टेंबरपर्यंत राहणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

30 AUG 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडा दिनी मॅरेथॉनमधील विजेत्यांचा गौरव

## शिवाजी विद्यापीठातील ४०० विद्यार्थी, प्राध्यापक सहभागी : आपल्या राष्ट्राच्या गौरवासाठी धावा हा दिला संदेश

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

जी-२० युनिव्हर्सिटी कनेक्ट प्रोग्राम व राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधत हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागामार्फत मिनी मॅरायॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेत ४०० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. यामध्ये नियमित धावपटू, खेळाडू, संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक हे सहभागी झाले होते. विजेत्या स्पर्धकांना बक्षिस देऊन गौरवण्यात आले. मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनासमोर ध्वज दाखवून स्पर्धेस प्रारंभ झाला. आपल्या राष्ट्राच्या गौरवासाठी धावा हा संदेश घेऊन मानव्यशास्त्र इमारत मार्गे धावत हे स्पर्धक मुलींचे वसतिगृह, कुलगुरू निवासस्थान,



कोल्हापूर : क्रीडा दिनी आयोजित मॅरेथॉनला झेंडा दाखवून उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड आदी

दूरशिक्षण केंद्र, क्रीडा अधिविभाग, क्रांतीवन, मुलांचे वसतिगृह, परीक्षा भवन, भाषा भवन, रसायनशास्त्र अधिविभाग, मुख्य इमारतीच्या समोरील आश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या समोरून राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृह येथे येऊन स्पर्धेची सांगता झाली.

**स्पर्धेचा निकाल**

**मुलांमध्ये :** पहिला क्रमांक तुकाराम मोरे (अर्थशास्त्र), दुसरा क्रमांक विजय बाजबाळकर (बी.लीप), तिसरा क्रमांक मयुरेश हासोळकर (इतिहास), चौथा क्रमांक विठ्ठल मोटे (इंग्रजी), पाचवा क्रमांक अशुतोष हंकारे (औद्योगिक रसायनशास्त्र), **मुलींमध्ये :** पहिल क्रमांक प्रेरणा धाडगे (तंत्रज्ञान), दुसरा क्रमांक विजया कालोले (तंत्रज्ञान), तिसरा क्रमांक प्रज्ञा पाटील (रसायनशास्त्र), चौथा क्रमांक तृप्ती इंगळे (इंग्रजी), पाचवा क्रमांक अपर्णा फाळके (वनस्पतीशास्त्र).

**अधिविभागातील शिक्षक, प्रशासकीय सेवक निकाल:** डॉ. सागर डेळेकर, डॉ. गजानन राशिनकर, लक्ष्मण परीट (रसायनशास्त्र), डॉ. एस. एम. पाटील (वनस्पतीशास्त्र), नितीन नाईक (सुक्ष्मजीवशास्त्र), प्रशांत जाधव (विद्यापीठ ग्राहक भांडार), डॉ. निलांबरी जगताप (मराठा इतिहास), अनुप्रिया तरवाळ (रसायनशास्त्र).

30 AUG 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदी डॉ. व्ही. एन. शिंदे

## डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याकडून नियुक्तीपत्र प्रदान : १६ पैकी १४ उमेदवारांनी दिली मुलाखत

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ कुलसचिव पदाच्या मुलाखती मंगळवारी पार पडल्या १६ पैकी १४ उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित होते. निवड समितीने मुलाखतीनंतर शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवपदी डॉ. व्ही. एन. शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी डॉ. शिंदे यांना नियुक्तीपत्र प्रदान करूनन अभिनंदन केले. भावी कारकीर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

डॉ. व्ही. एन. शिंदे यांना प्रशासकीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांनी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे सन २०१० ते २०१२ या कालावधीत कुलसचिवपद भूषविले. शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव म्हणूनही त्यांनी प्रशासकीय कामकाजाचा ठसा उमटविला आहे. विद्यापीठाच्या सोलापूर येथील पदव्युत्तर शिक्षण केंद्रासह विद्यापीठाच्या विविध विभागांचे उपकुलसचिव म्हणून कार्यरत होते. सध्या सभा, निवडणुका आणि उद्यान विभागांसह प्रभारी कुलसचिव पदाचे कामकाजही पाहातात. तत्पूर्वी, बारामती येथील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय आणि शिवाजी विद्यापीठाचा पदार्थविज्ञान अधिविभागात पदार्थविज्ञान शास्त्राचे पाच वर्षे अधिव्याख्याता होते. डॉ. शिंदे शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी असून एम्.एस्सी. (भौतिकशास्त्र) परीक्षेत विद्यापीठात प्रथम होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना नियुक्तीपत्र प्रदान करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. वैभव ढेरे.

### सर्व घटकांना सोबत घेऊन मातृसंस्थेचा लौकिक उंचावणार

शिवाजी विद्यापीठ ही माझी मातृसंस्था असून तिचा लौकिक उंचावण्यासाठीच मी आजवर काम करीत आलो आहे. या संस्थेच्या कुलसचिव पदाची जबाबदारी ही माझ्या दृष्टीने सर्वोच्च संधी असून येथील सर्व घटकांना सोबत घेऊन यापुढील काळात काम करण्यास प्राधान्य राहील. ही संधी दिल्याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्र-कुलगुरू यांच्याप्रतीं मी कृतज्ञता व्यक्त करतो.

डॉ. विलास शिंदे (नूतन कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ)

क्रायोजेनिक्स विषयातील विकासात्मक संशोधनासाठी प्रा. एम्. सी. जोशी पुरस्काराचे ते सहमानकरी आहेत. वृक्षलागवड आणि वृक्षसंवर्धन हे त्यांचे जिव्हाळ्याचे विषय असून विद्यापीठ जलयुक्तीसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. विज्ञान साहित्यिक म्हणूनही डॉ. शिंदे लोकप्रिय असून, एकक्कांचे मानकरी, असे घडले भारतीय शास्त्रज्ञ, हिरव्या बोटांचे किमयागार, आवर्त सारणी व मूलद्रव्यांची दुनिया आणि एकक्कांचे इतर मानकरी ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कारांमधील विज्ञान साहित्यासाठीचा 'महात्मा जोतीराव फुले पुरस्कार' प्राप्त झाला आहे. त्याचबरोबर जी. डी. कुलकर्णी पारितोषिक', विकासात्मक संशोधनाबद्दल 'इंडियन क्रायोजेनिक्स कौंसिल'चे 'प्रा. एम.सी. जोशी पारितोषिक', दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचा 'कृ.गो. सूर्यवंशी साहित्य पुरस्कार,' मिरजेच्या चैतन्य शब्दांगण साहित्य गौरव पुरस्कारांतील कै. अशोक कोरे स्मृती पुरस्कार, जलसंधारण कार्याबद्दल एन्वायर्नमेंट कॉझर्वेशन अँड रिसर्च ऑर्गनायझेशन, चिखली यांचा 'वसुंधरा पुरस्कार' आणि विज्ञान प्रसारासाठी लेखन आणि कार्यासाठी इंडियन फिजिक्स असोसिएशन, पुणे यांचा मो. वा. चिपळोणकर पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

- नियमित शुल्कासह ११ सप्टेंबरपर्यंत परीक्षा अर्ज भरण्यास मुदत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२३ हिवाळी सत्रातील परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. महाविद्यालयात किंवा पदव्युत्तर अधिविभागातील विद्यार्थ्यांनी नियमित शुल्कासह ११ सप्टेंबरपर्यंत परीक्षा अर्ज भरावयाचा आहे. परीक्षा अर्ज भरण्याच्या सुधारीत तारखा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.



शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२३ हिवाळी सत्रातील परीक्षा अर्ज विलंब शुल्कासह (५० रूपये ज्यादा) १४ सप्टेंबर आणि अतिविलंब शुल्कासह (३५० रूपये ज्यादा)१६ सप्टेंबरपर्यंत अर्ज भरावयाचा आहे. महाविद्यालय किंवा पदव्युत्तर अधिविभागांनी ऑनलाईन परीक्षा अर्ज नियमित शुल्कासह १२ सप्टेंबरपर्यंत, विलंब शुल्कासह १५ सप्टेंबर आणि अतिविलंब शुल्कासह १६ सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन स्विकारायचा आहे. तरी विद्यार्थी, महाविद्यालय आणि अधिविभागांनी याची दखल घेवून, वेळेत परीक्षा अर्ज भरावयाचा आहे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.